0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दि. २५/०७/२०११ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्र.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५४/२०११/जा.६१२, दि. २९/०७/२०११ व २४/०८/२०११

३) तपासी पोलीस अधिकारी तथा पोलीस नाईक यांचे दि. ३०/०८/२०११ रोजीचे अभिवेदन.

४) रिक्षा टेम्पो क्र.एमएच-०५-के-७६४० चे मालक विलास कुशाबा साठे व वसंत कुशाबा साठे यांचे दिनांक ३०/०८/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५४/२०११/जा. ८८६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक : 22/०९/२०११.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १५/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचासह रुम नंबर १२४६ समोरील मोकळे मैदान, घाडगे नगर, अंबरनाथ (पूर्व) येथे येऊन बातमीच्या अनुषंगाने टेहळणी करत उभे राहिले असता, मैदानात उभ्या असलेल्या निळ्या रंगाच्या तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०५-१९४८ मध्ये एक इसम येऊन ती चालू करीत असल्याचे दिसून आले. सदर इसमास गाडी बंद करण्यास सांगून, गाडीची पहाणी पंचासमक्ष केली असता. सदर टेम्पो क्र. एमएच-०५-१९४८ मध्ये ३५ लि. क्षमतेच्या काळ्या रंगाच्या १४ कॅनमध्ये एकूण ४९० लिटर्स निळे केरोसिन आढळून आले.

त्याचप्रमाणे खात्रीलायक बातमीच्या अनुषंगाने वरील टेम्पोच्या बाजूला असलेला टेम्पो क्र. एमएच-०५-७६४० ची पहाणी केली असता. त्यामध्येही ३५ लिटर क्षमतेच्या काळ्या रंगाच्या सहा कॅनमध्ये एकूण २१० लिटर्स निळ्या रंगाचे केरोसिन आढळून आले. सदर इसमास ताब्यात घेऊन त्याचे नाव व गाडीमधील केरोसिन कोठून आणले, याबाबत पंचासमक्ष विचारणा केली असता, त्याने त्याचे नाव वसंत कुशाबा साठे असे सांगुन तो रुम नं. १२४६, घाडगे नगर, अंबरनाथ (पूर्व) येथे पंधरा वर्षापासून राहत असून गेल्या दोन महिन्यापासून केरोसिन विक्रीचा

अनधिकृत धंदा करीत असल्याचे सांगितले. गाडयामध्ये आढळून आलेले केरोसिन अंबरनाथ येथील फेरीवाल्यांकडून प्रति लिटर रुपये १८/- या प्रमाणे विकत घेतले असून ते अंबरनाथ येथील चहावाले, फेरीवाले, भजीयावाले, टपरीधारक ग्राहकांना प्रति लिटर रुपये २३/- प्रमाणे विक्री करीत असून, सदरचे केरासिन खरेदी व विक्रीबाबत त्याच्याकडे कुठलेही कागदपत्रे नसल्याचे त्याने सांगितले. त्याचप्रमाणे केरोसिन खरेदी, साठवणूक, विक्री व वाहतूकीसाठी वरील दोन्ही टेम्पो क्र. एमएच-०५-१९४८ व एमएच-०५-के-७६४० यांचा वापर करण्यात येतो, असेही वसंत साठे यांनी पंचासमक्ष सांगितले. त्यानुसार त्यांचा लेखी जबाब नोंदवून घेण्यात आला आहे.

अशाप्रकारे वसंत कुशाबा साठे याने शासनाने अनुदानित दराने फक्त शिधावाटप दुकानातून शिधापत्रिकाद्वारे सर्वसामान्य जनतेला दिवाबत्ती व स्वंयपाकाच्या कामाकरिता उपलब्ध करुन दिलेल्या शासन नियंत्रित केरोसिनची अनधिकृतपणे व बेकायदेशिररित्या खरेदी, विक्री, साठवणूक व वाहतूक केल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द [१] जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, १० [२] दि केरोसिन (रिस्ट्रीक्शन ऑन युज ॲण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्रायजेस) ऑर्डर, १९९३ चे कलम ३ [३] दि महाराष्ट्र केरोसिन डिलर लायन्ससिंग ऑर्डर-१९६६ चे कलम ३ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द अंबरनाथ पोलिस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II २५/२०११ दि.१५/०७/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | काळ्या रंगाच्या ३५ लिटर क्षमतेच्या एकूण २० प्लॅस्टिक कॅनमधील निळ्या रंगाच्या केरोसिनचा साठा | ७०० लिटर | २६,६००/- |
| २ | रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-१९४८ | १ नग | ३६,०००/- |
| ३ | रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-७६४० | १ नग | ३६,६००/- |
| ४ | काळे रंगाचे ३५ लि. क्षमतेचे एकूण २० रिकामे कॅन | २० नग | २,०००/- |
| | | एकूण | १,०१,२००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उप नियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली असून, त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १६/०८/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी / अपचारी उपस्थित राहीले नाहीत. तथापी, वसंत साठे यांनी, त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनाद्वारे विनंती केली. सबब, पुढील सुनावणी दि. ३०/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली व तसे सर्व संबंधितांना कळविण्यात आले.

दिनांक ३०/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलीस नाईक श्री दिलीप कृष्णा सागर उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ३ अन्वये अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस रिक्षा टेम्पो क्र.एमएच-०५-के-७६४० चे मालक विलास कुशाबा साठे व वसंत कुशाबा साठे उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये स्वतंत्र निवेदन सादर केले.

सदर सुनावणीस रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-के-१९४८ चे मालक उपस्थित राहीले नाहीत. तथापी, तपासी प्रोलीस अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेल्या अभिवेदनात, परिवहन विभागाकडील प्राप्त माहितीनुसार रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-के-१९४८ चे मालक गुरुदत्ता नागप्पा शेरेगर असून, त्यांच्या पत्त्यावर शोध घेतला असता मिळून आले नाहीत. सदर टेम्पो हा सध्या वसंत साठे यांचे ताब्यात असल्याचे नमुद केले आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयाकरीता राखीव ठेवण्यात आले.

DIRECTOR CIVIL SUPPLIES OFFI MUMBAI

**युक्तिवाद :-**

सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस नाईक श्री. दिलीप कृष्णा सागर यांनी युक्तीवाद केला की, सदर गुन्ह्यातील आरोपीकडून जप्त करण्यात आलेले शासकीय केरोसीन कोठून प्राप्त केले, याबाबत आरोपी यांनी अटक मुदतीत कोणतेही सहकार्य केलेले नाही व काहीही माहिती दिलेली नाही. सदरचे निळे केरोसीन आरोपीस न देता शासकीय शिधावाटप कार्यालयास देण्यात यावे. जप्त मुद्देमालापैकी केरोसीन हे ज्वलनशील असल्याने त्याची लवकरात लवकर विल्हेवाट लावण्याबाबत आदेश द्यावेत, असे सांगून तसे अभिवेदन सादर केले.

सुनावणीस उपस्थित रिक्षा टेम्पो क्र.एमएच-०५-के-७६४० चे मालक विलास कुशाबा साठे यांनी युक्तिवाद केला की, जप्त टेम्पो क्र. एमएच-०५-के-७६४० हा त्याचे नावावर आहे. सदर टेम्पो हा कामानिमीत्त त्याचे भाऊ वसंत साठे यांनी मागीतला असता त्याला दिला. परंतू त्याने कोणत्या कामासाठी टेम्पो पाहीजे याबाबत काहीही सांगीतले नाही. या टेम्पोवर त्याचे कुटूंबाचे उदरनिर्वाह चालते. तरी जप्त टेम्पो परत मिळावा, असे सांगून तसे निवेदन सादर केले.

सुनावणीस उपस्थित वसंत कुशाबा साठे यांनी युक्तिवाद केला की, जप्त केरोसीन त्याने फेरीवाल्याकडून घेवून अंबरनाथ येथे नाक्यावर उभा राहून जसे ग्राहक मिळेल तसे त्यांना विकत होतो. त्याची अंबरनाथ पोलीसांकडे कोणत्याही गुन्ह्याची नोंद नाही. त्याला काहीही प्रकारचा कामधंदा नसल्यामुळे सदरचा उद्योग त्याचेकडून झाला आहे. यापुढे त्याचेकडून अशाप्रकारची तक्रार होणार नाही याची काळजी घेईल, असे सांगून तसे निवेदन सादर केले.

जप्त रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-के-१९४८ चे मालक यांना पुरेसी संधी देवून देखील सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक १५/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचासह रुम नंबर १२४६ समोरील मोकळे मैदान, घाडगे नगर, अंबरनाथ (पूर्व) येथे येऊन टेहळणी करत उभे राहिले असता, मैदानात उभ्या असलेल्या निळ्या रंगाच्या तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०५-१९४८ मध्ये एक इसम येऊन टेम्पो चालू करत असल्याचे दिसून आल्याने सदर इसमास गाडी बंद करण्यास सांगून, पंचासमक्ष गाडीची पहाणी केली असता, सदर टेम्पो क्र. एमएच-०५-१९४८ मध्ये ३५ लि. क्षमतेच्या काळ्या रंगाच्या १४ कॅनमध्ये एकूण ४९० लिटर्स निळे केरोसिन आढळून आले. त्याचप्रमाणे खात्रीलायक बातमीच्या अनुषंगाने वरील टेम्पोच्या बाजूला असलेला टेम्पो क्र. एमएच-०५-७६४० ची पहाणी केली असता, त्यामध्येही ३५ लिटर क्षमतेच्या काळ्या रंगाच्या सहा कॅनमध्ये एकूण २१० लिटर्स निळ्या रंगाचे केरोसिन आढळून आले. सदर इसमाकडे याबाबत विचारणा केली असता, त्याने त्याचे नाव वसंत कुशाबा साठे असे सांगून गेल्या दोन महिन्यापासून केरोसिन विक्रीचा अनधिकृत धंदा करीत असल्याचे सांगितले. गाडयामध्ये आढळून आलेले केरोसिन अंबरनाथ येथील फेरीवाल्यांकडून प्रति लिटर रुपये १८/- या प्रमाणे विकत घेतले असून ते अंबरनाथ येथील चहावाले, फेरीवाले, भजीयावाले, टपरीधारक ग्राहकांना प्रति लिटर रुपये २३/- प्रमाणे विक्री करीत असून, सदरचे केरासिन खरेदी व विक्रीबाबत त्याच्याकडे कुठलेही कागदपत्रे नसल्याचे त्याने सांगितले. त्याचप्रमाणे केरोसिन खरेदी, साठवणूक, विक्री व वाहतूकीसाठी वरील दोन्ही रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-१९४८ व एमएच-०५-के-७६४० यांचा वापर करण्यात येतो, असेही वसंत कुशाबा साठे यांनी पंचासमक्ष सांगितले. यावरुन सदरचे दोन्ही रिक्षा टेम्पो व त्यामधील ३५ लि. क्षमतेच्या २० कॅनमधील ७०० लिटर निळे केरोसीनचा साठा जप्त करण्यात आला.

पोलिसांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील आरोपीकडून जप्त करण्यात आलेले शासकीय केरोसीन कोठून प्राप्त केले, याबाबत आरोपी यांनी अटक मुदतीत कोणतेही सहकार्य केलेले नाही व काहीही माहिती दिलेली नाही. तसेच परिवहन विभागाकडील प्राप्त माहितीनुसार रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-के-१९४८ चे मालक गुरुदत्ता नागप्पा शेरेगर असून, त्यांच्या पत्त्यावर शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. सदर टेम्पो हा सध्या वसंत साठे यांचेच ताब्यात असून, सदरचे निळे केरोसीन आरोपीस देवू नये. केरोसीन हे ज्वलनशील असल्याने त्याची लवकरात लवकर विल्हेवाटीचे आदेश व्हावेत, असे नमुद केले आहे. आरोपी वसंत कुशाबा साठे यांनी केलेल्या खुलाशात, जप्त केरोसीन त्याने फेरीवाल्याकडून घेवून अंबरनाथ येथे नाक्यावर उभा राहून जसे ग्राहक मिळेल तसे त्यांना विकतात. त्याला काहीही प्रकारचा कामधंदा नसल्यामुळे सदरचा उद्योग त्याचेकडून झाला असल्याचे नमुद करुन शासन नियंत्रित केरोसीन बेकायदेशीररित्या जवळ बाळगल्याचे त्याने मान्य केले आहे. तसेच घटनेच्या वेळी दिलेल्या जबाबातही सदरची बाब मान्य करुन जप्त केलेल्या दोन्ही रिक्षा टेम्पोचा केरोसीन खरेदी विक्री व वाहतुक करण्यासाठी वापर करण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. यावरुन आरोपी यांनी स्वत:च्या फायद्यासाठी जाणीवपूर्वक शासन नियंत्रीत निळे केरोसिनची अवैधमार्गाने व बेकायदेशीररित्या खरेदी, विक्री, वाहतूक व साठवणूक केल्याचे सिध्द होते. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेली रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-के-७६४० ही विलास कुशाबा साठे यांची मालकीची असल्याचे त्यांनी सादर केलेल्या वाहन नोंदणी परवान्यावरुन दिसून येते. तसेच सदर टेम्पोचे मालक यांनी सादर केलेल्या खुलाशात, सदर टेम्पो हा त्याचे भाऊ वसंत साठे यांनी कामानिमीत्त मागीतला असता त्याला दिला. परंतू त्याने कोणत्या कामासाठी टेम्पो पाहीजे याबाबत काहीही सांगीतले नाही. या टेम्पोवर त्याचे कुटूंबाचे उदरनिर्वाह चालत असल्याने जप्त टेम्पो त्याला परत मिळावा, असे नमुद केले आहे. तथापी, आरोपी वसंत साठे यांनी शासन नियंत्रित निळे केरोसीनची बेकायदेशीररित्या खरेदी, विक्री व वाहतूक करण्यासाठी सदर रिक्षा टेम्पोचा गैरवापर केला आहे. सदर रिक्षा टेम्पो मालकाने दिलेल्या निवेदनावरुन, टेम्पो मालकाचे अपरोक्ष जरी त्याचे वाहनाचा गैरवापर झाला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यानी त्याचे वाहनाचा गैरवापर होणार नाहीं याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच जप्त रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-के-१९४८ चे मालक यांना त्यांचें म्हणणे मांडण्याची पुरेसी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. तथापी, जप्त रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-के-१९४८ बाबत परिवहन विभागाचे माहितीनुसार सदर टेम्पोचे मालक गुरुदत्ता नागप्पा शेरेगर यांच्या पत्त्यावर शोध घेतला असता तो मिळून आले नाही. सदर टेम्पो हा सध्या वसंत साठे यांचेच ताब्यात असल्याचा खुलासा सुनावणीचे वेळी पोलीसांनी केला आहे. त्याचप्रमाणे सदर टेम्पोचा वापर केरोसीनची खरेदी विक्री व

वाहतुक करण्यासाठी होत असल्याचा खुलासा आरोपी वसंत साठे यांनी केला आहे. यावरुन शासन नियंत्रित केरोसीनची बेकायदेशीरित्या खरेदी, विक्री व वाहतुक करण्यासाठी सदरचा टेम्पोचा गैरवापर आरोपी वसंत साठे यांनी केला असल्याचे दिसून येते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचे जप्त करण्यात आलेले दोन्ही रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-१९४८ व एमएच-०५-के-७६४० हे त्यांच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे टेम्पो त्यांच्या मालकास परत करण्याच्या अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये अंबरनाथ पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II २५/२०११ दि.१५/०७/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश :-</u>**

१) जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा एकुण ७०० लिटर साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेले सदरचे निळे केरोसिन उपनियंत्रक शिधावाटप, फ -परिमंडळ कार्यालय, ठाणे यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांस, पोलीसांनी नियंत्रीत दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेले दोन्ही रिक्षा टेम्पो क्र. एमएच-०५-१९४८ व एमएच-०५-के-७६४० हे शासनजमा करण्यात येत आहे. सदर दोन्ही टेम्पो त्यांच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे टेम्पो त्यांच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा टेम्पो लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

४) रिकाम्या होणारे ३५ लिटर क्षमतेचे एकूण २० कॅन पोलीसांनी किरकोळीने प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) वसंत कुशाबा साठे
२) टेम्पो क्र. एमएच-०५-१९४८ चे मालक
३) टेम्पो क्र. एमएच-०५-७६४० चे मालक
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, अंबरनाथ पोलिस स्टेशन, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, अंबरनाथ पोलीस ठाणे, अंबरनाथ यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोंच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.